<u>**नियमित दिवाणी दावा क्र. ५६/२०११**</u>
<u>**निशाणी ८३ पुढे सुरु**</u>

शपथेवर पुढे सुरु –

<u>**प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. एस.डी.काणे यांच्या मार्फत पुढील सरतपासः–**</u>

४. माझ्या शपथपत्रामधील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे.

५. मी नि.क्र. ८५/1 वर दि. १९.०६.१९९७ रोजीची ईसार पावतीची मुळ प्रत दाखल केलेली आहे. त्यावर लिहुन घेणार म्हणुन माझे नाव असुन लिहुन देणार म्हणुन भानुदास दंदी यांचे नाव आहे. त्यावर लिहुन घेणार म्हणुन माझी सही आहे. त्यावर साक्षीदार म्हणुन गोवर्धन दंदी आणि गोविंदराव खुशाल सावळे यांचे अनुक्रमे अंगठा आणि सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (सदर दस्तास निशाणी देण्यास वादीचे वकील श्री. एस.टी. इंगळे यांनी हरकत नोंदविली. त्यांनी युक्तिवाद केला की सदर दस्तातील मजकुर पाहता दस्तावरील साक्षीदार तपासल्याशिवाय आणि दस्त नोंदणीकृत असल्याशिवाय त्यास निशाणी देता येणार नाही. प्रतिवादी तर्फे वकील श्री. एस.डी.काणे यांनी असा युक्तिवाद केला की, दस्त झाला त्या दिवशी दस्ताला नोंदणीकृत करणे आवश्यक नव्हते. त्यामुळे सदर दस्तास निशाणी देण्यात यावी. आदेश – दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. दस्ताची पाहणी केली. प्रतिवादीने दि. १९.०६.१९९७ रोजीच्या ईसार पावतीचा मुळ दस्त दाखल केलेला आहे. साक्षीदार त्या दस्तावरील लिहुन घेणार असुन त्यांनी त्यांची सही केली आहे. त्यामुळे साक्षीदार दस्तातील पक्षकार आहे. दस्त नोंदणीकृत असावा किंवा नाही ही बाब गुणवत्तेवर न्यायनिर्णय करतांना ठरवणे संयुक्तिक होईल, त्यामुळे वादीचा आक्षेप फेटाळण्यात येतो.) सदर दस्तास सदर मुद्दा सिध्द करण्याच्या अटीवर (subject to proof) **नि.क्र. ८६** देण्यात येते.

६. मी नि.क्र. ८५/२ वर सन २००३–२००४ या कालावधीच्या गट नं. १७१/२अ या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याची सही शिक्क्याची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र. ८७** देण्यात येते. मी नि.क्र. ८५/३ वर फेरफार क्र. ३०७९

च्या सही शिक्क्याची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र. ८८** देण्यात येते. मी नि.क्र. ८५/४ वर सन २००९–२०१० ते सन २०१२–२०१३ या कालावधीच्या गट नं. १७१/२अ या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याची सही शिक्क्याची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र. ८९** देण्यात येते. मी नि.क्र. ८५/५ वर सन २००९–२०१० या कालावधीचा गट नं. १७१/२अ या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याची सही शिक्कयाची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र. ९०** देण्यात येते. मी नि.क्र. ८५/६ सन २००६–२००७ या कालावधीचा गट नं. १७१/२अ या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याची सही शिक्कयाची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.९१** देण्यात येते. मी नि.क्र. ८५/७ वरसन २००५–२००६ या कालावधीचा गट नं. १७१/२अ या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याची सही शिक्कयाची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र. ९२** देण्यात येते. मी नि.क्र. ८५/८ वर सन २००४–२००५ या कालावधीचा गट नं. १७१/२अ या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याची सही शिक्कयाची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र. ९३** देण्यात येते. मी नि.क्र. ८५/९ वर सन २००२–२००३ या कालावधीचा गट नं. १७१/२अ या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याची सही शिक्कयाची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र. ९४** देण्यात येते. मी नि.क्र. ८५/१० वर सन २००१–२००२ या कालावधीचा गट नं. १७१/२अ या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याची सही शिक्कयाची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र. ९५** देण्यात येते.

७. मी नि.क्र. ८५/११ वर मी दिनांक ०५.०६.१९९८ रोजीच्या खरेदीखताची मुळ प्रत दाखल केलेली आहे. त्यावर लिहुन घेणार म्हणुन श्याम पांडुरंगजी भिरड आणि लिहुन देणार म्हणुन धर्माजी तानुजी दंदी यांची नावे आहेत. सदर दस्तावर साक्षीदार म्हणुन माझी सही आहे. सदर खरेदीखत धर्माजी दंदी यांनी श्याम भिरडच्या लाभात करुन दिले. धर्माजी दंदी मयत झालेले आहेत. सदर दस्तामधील मजकुर खरा व बरोबर आहे. (सदर दस्तास निशाणी देण्यास वादीतर्फे कोणतीही हरकत नोंदविण्यात आली नाही.) त्यास **नि.क्र. ९६** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**<u>वादी तर्फे विधीज्ञ श्री.एस.टी.इंगळे यांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.</u>**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.10.03 11:36:14 +0530

दिनांक : ०१/१०/२०२५.

ठिकाणः बाळापूर

( श्रीमती डी. एम. पाटील )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बाळापूर.